# सामाजिक जाणीव संवर्धन

## ......प्रयोगातून प्रशिक्षणाकडे......



**अनघा कुकडे-लवळेकर**



"'लोकशाहीनिष्ठ समाजरचनेचे नागरिक होण्याचं शिक्षण मुलांना आपण द्यायला हवं. एका मुक्त आणि समतोल समाजव्यवस्थेमधील स्वतंत्र व समान ताकदीचे स्त्री आणि पुरुष म्हणून त्यांनी जगलं पाहिजे. 'स्व'त्वाची जाणीव ही समाजाच्या संदर्भात सतत बदलत असते; म्हणूनच प्रत्येक व्यक्तीनं या बदलातील महत्त्वाचा घटक होण्याचा निश्चय केला पाहिजे.''

–स्वामी रंगनाथानंद

'सामाजिक जाणीव' ही संकल्पनाही याच विषयाचा आविष्कार आहे. समाजातील विविध प्रवाहांबद्दलची, समस्यांबद्दलची सजगता, त्या समजून घेण्याची आणि त्यावर कृती करण्याची इच्छा म्हणजेच सामाजिक जाणीव! सामाजिक जाणिवेच्या संकल्पनेपासून प्रत्यक्ष 'संवर्धना'च्या प्रयत्नांकडे नेणारं एक पाऊल म्हणजे 'सामाजिक जाणीव संवर्धन–प्रयोगातून प्रशिक्षणाकडे' हे पुस्तक !

विविध वयोगटातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी औपचारिक वा अनौपचारिक पद्धतीनं काम करणाऱ्या शिक्षकांना व कार्यकर्त्यांना हे पुस्तक निश्चितच नव्या जाणिवा व नवे उपक्रम देऊन जाईल.

**छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे**
**किंमत : ₹ १००**



# सामाजिक जाणीव संवर्धन

## प्रयोगातून प्रशिक्षणाकडे

**वा. अनघा कुकडे-लवळेकर**

छात्र प्रबोधन प्रकाशन सातवे
**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

**‘सामाजिक जाणीव संवर्धन – प्रयोगातून प्रशिक्षणाकडे’**
**विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीव वाढविण्यासाठीची कृति–पुस्तिका**

© हक्क प्रकाशकाधीन

**प्रकाशक**
श्री. वि. शं. देशपांडे
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०.

**मुद्रक**
संपादक, छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

**अक्षर जुळणी**
छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**मुखपृष्ठ व अंतर्गत सजावट**
श्री. गिरीश सहस्रबुद्धे

**प्रथम आवृत्ती**
सौर श्रावण २८, शके १९२६, १९ ऑगस्ट २००४ (१००० प्रती)
**पुनर्मुद्रण १**
सौर वैशाख १२, शके १९३८, २ मे २०१६ (५०० प्रती)

**किंमत**
**₹ १००/-**

Samajik Janeev Samvardhan Prayogatoon Prashikshanakade
( A workbook for developing social awareness among students )
by Dr. Anagha Kukade-Lavalekar, in Marathi.

# प्रस्तावना

ज्ञान प्रबोधिनीची स्थापना १९६२ साली झाली. सुरुवातीला काही वर्षे विविध शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संध्याकाळी विशेष मार्गदर्शन वर्ग चालवणे एवढेच प्रबोधिनीच्या कामाचे मर्यादित स्वरूप होते. या मार्गदर्शन वर्गाला प्रबोधशाळा असे म्हणत. प्रबोधशाळा सुरू झाल्यावर दोनच महिन्यांत ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनचे भारतावर आक्रमण झाले. युद्धाच्या बातम्या येऊ लागल्या. प्रबोधशाळेच्या दहावीच्या वर्गात या बातम्यांवर चर्चा योजण्यात आली. बहुसंख्य विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातल्या विषयांचे सखोल ज्ञान मिळवण्यासाठी आपण प्रबोधशाळेत आलो आहोत असे वाटत होते. त्यांच्या दृष्टीने भारत–चीन युद्धावरच्या चर्चेला प्रबोधशाळेच्या कार्यक्रमात वेळ देण्याची गरज नव्हती. प्रबोधिनीच्या दृष्टीने ज्या ज्या विषयांचा आणि घटनांचा आपल्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनावर परिणाम होतो त्या सर्वांचा अभ्यास करण्यासाठीच प्रबोधशाळा होती. क्रमिक शिक्षण हा त्यातला एक भाग होता. सद्य:स्थितीचा अभ्यास करून त्या स्थितीला आपला प्रतिसाद निश्चित करणे व तो कार्यवाहीत आणणे हाही तितकाच महत्त्वाचा भाग होता.

सद्य:स्थितीच्या अशा अभ्यासाला वेळ मिळावा यासाठी प्रबोधशाळेमध्ये आणि नंतरच्या पूर्ण वेळच्या प्रशालेमध्ये वेळापत्रकातच परिस्थितिज्ञानाच्या तासिकांची योजना प्रथमपासूनच केलेली आहे. या तासिकांसाठी पाठ्यक्रम (Syllabus) ठरवणे अवघड आहे. आजवर परिस्थितिज्ञानाच्या तासिका घेणाऱ्या सत्रसंचालकांनी आशय (content) – पद्धती (process) – संदर्भ (context) या अध्यापन – प्रक्रियेच्या तीन पेडांपैकी 'समकालीन इतिहासाचे भान' निर्माण करणे या संदर्भाकडेच अधिक लक्ष दिले होते. परिस्थितीचा अभ्यास म्हणजे कशाचा अभ्यास करायचा हे विद्यार्थ्यांच्या वयानुसार बदलत जाऊ शकते. सातवीच्या वर्गात मुलांच्या 'रिक्षावाल्या काकां'च्या संपाबाबत चर्चा होऊ शकते. आठवीच्या वर्गात क्रिकेटचा सामना आपल्या खेळाडूंनी कसा फिरवला याची चर्चा होऊ शकते. नववीच्या वर्गात शेतीतील प्रयोग परिवाराची कल्पना समजून घेण्याचा प्रयत्न होऊ शकतो. दहावीचे विद्यार्थी नर्मदा

बचाओ आंदोलन आणि गुजरातमध्ये स्वाध्यायींनी केलेल्या विहिरींच्या पुनर्भरणाचा प्रयोग यांची तुलना करू शकतात. परिस्थितिज्ञान तासिका घेणारे अध्यापक स्वत: किती जागरूक आहेत आणि विद्यार्थी किती जिज्ञासू आहेत यावर आशयाची व्याप्ती व खोली आणि प्रक्रियेची विविधता ठरते.

परिस्थितिज्ञानाच्या अभ्यासातून समकालीन इतिहासाचे भान निर्माण व्हावे हे महत्त्वाचे. समकालीन इतिहासामध्ये समाजस्थितीबरोबरच विज्ञान, तंत्रज्ञान. अर्थव्यवस्था, राजकारण, परराष्ट्रसंबंध, साहित्य, नीतिमूल्ये यांतील प्रगती व बदलांचे ज्ञानही आवश्यक असते. याशिवाय भौगोलिक शोधमोहिमा, संशोधन, क्रीडा व कला यांतील नैपुण्यासाठी केलेली तपश्चर्या, अन्यायाला विरोध, संपत्तीची निर्मिती, आत्मसन्मानासाठी केलेला त्याग, दाखवलेले धैर्य, प्रतिकूल परिस्थिती पालटण्यासाठी केलेले परिश्रम, दाखवलेली चिकाटी अशा व्यक्तिगत व सामूहिक जीवनाच्या अनेक पैलूंची ओळखही परिस्थितिज्ञानासाठी आवश्यक आहे. किंबहुना जे औपचारिक शिक्षणाच्या चौकटीमध्ये, त्या चौकटींच्या मर्यादांमुळे होऊ शकत नाही, असे शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांकडे नेणारे शिक्षण व्हावे यासाठीच परिस्थितिज्ञानाच्या तासिकेची योजना ज्ञान प्रबोधिनीमध्ये केली जाते.

परिस्थितिज्ञानाची ही सत्रे उपयुक्त वाटल्यामुळे त्याचे काही शैक्षणिक तंत्रज्ञान तयार व्हायला हवे असे वाटत होते. सामाजिक संदर्भाच्या अनेक घटकांपैकी 'सामाजिक अन्याय' हा एक घटक निवडून त्याविषयीची जाणीव निर्माण करण्याच्या प्रक्रियेचे मानसशास्त्रीय संशोधन वाचस्पती. अनघा कुकडे-लवळेकर यांनी केले. त्या संशोधनाचे शिक्षणशास्त्रातील उपयोजन म्हणून हे पुस्तक तयार केले. त्यामध्ये सत्राचे नियोजन, सत्र-संचालनासंबंधी सूचना, शैक्षणिक साहित्याची निर्मिती व वापर, मूल्यमापनाची साधने इ. संबंधीच्या सूचनांमुळे शैक्षणिक तंत्रज्ञान निर्मितीला प्रारंभ झाला आहे असे म्हणता येईल. अध्यापकांना स्वाध्यायासाठी आणि अध्यापकांचे प्रशिक्षण करणाऱ्यांना प्रशिक्षण साहित्य म्हणून या पुस्तकाचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा. वृत्तिघडण आणि प्रेरणाजागरण या शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांना साहाय्यभूत होऊ शकेल असे पुस्तक तयार झाल्याचा आनंद मी येथे व्यक्त करतो.

सामाजिक जाणीव, सामाजिक कृतिशीलता व सामाजिक बांधिलकी यांकडे बघण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन स्थल-काल-प्रसंग-वारंवारिता व अनुभवाची तीव्रता यानुसार घडत असतात. दृष्टिकोन तयार होण्याची प्रक्रिया क्रमिक शिक्षणापूर्वी सुरू होते आणि त्या शिक्षणानंतरही ती प्रक्रिया आयुष्यभर चालू राहू शकते. या प्रक्रियेला

गती देण्यासाठी एखादे शैक्षणिक साधन आहे का? या शैक्षणिक साधनाचा परिणाम मोजता येईल का? हा परिणाम सर्वाधिक व नेमका होण्यासाठी काय करायला हवे? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वाचस्पती अनघा कुकडे-लवळेकर यांचे पीएच.डी. साठीचे संशोधन झाले. ज्ञान प्रबोधिनीच्या अगदी स्थापनाकाळापासून परिस्थितिज्ञानाच्या तासिका चालू आहेत. त्यामुळे आधी व्यवहार, मग शास्त्रीय संशोधन व नंतर व्यवहाराची प्रत सुधारण्यासाठी त्या संशोधनाचे उपयोजन अशा साखळीतील शेवटच्या दुव्यासाठी हे पुस्तक सिद्ध झाले आहे. वरील सर्व प्रश्न व्यावहारिक असल्याने पीएच.डी. च्या मूळ प्रबंधावरून व्यवहारात उपयोजनासाठी हस्तपुस्तिकावजा हे पुस्तक तयार झालेले आहे. म्हणूनच त्याचे नाव 'सामाजिक जाणीव संवर्धन : प्रयोगातून प्रशिक्षणाकडे' असे ठेवले असावे.

सामाजिक जाणिवेतून सामाजिक कृतीसाठी आवश्यक वृत्तिघडणीमध्ये १) आजूबाजूच्या समाजाच्या अस्तित्वाचे भान, २) या समाजातील लोक आपल्यासारखेच भावना, गरजा, अपेक्षा, स्वप्ने असलेले आहेत याची जाणीव, ३) समाजातील अन्य व्यक्तींच्या व व्यक्तींच्या गटांच्या प्रगतीचे, अगतिकतेचे वा दुर्दशेचे आकलन, ४) ज्याची जाणीव व आकलन झाले त्याची प्रत्यक्ष वा कल्पनेने अनुभूती घेण्याची इच्छा आणि ५) इतरांच्या प्रगतीमध्ये आनंद मानण्याची व इतरांचे प्रश्न आपले मानून ते सोडवण्याला प्रवृत्त होण्याची तयारी – एवढे सारे शिक्षण होणे अभिप्रेत आहे. या पुस्तकात मुख्यत: यातल्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याचे प्रशिक्षण कसे द्यावे याचा एक आराखडा मांडला आहे. पहिला टप्पा गृहीत धरला आहे; पण काही वेळा त्यासाठीही विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शकाला योजनापूर्वक प्रयत्न करावे लागतात.

शास्त्रीय पद्धतीने संशोधन करायचे म्हणजे गृहीत-प्रयोग-निरीक्षणे-निष्कर्ष-पडताळा अशा क्रमाने जाणे भाग आहे. 'परिस्थितिज्ञान' या संकल्पनेतील अनेक विषयांपैकी संशोधन पद्धती सहज लावता येईल व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद सहज मिळू शकेल असे वाटल्याने. 'सामाजिक जाणीव' या व्यापक उद्दिष्टातील 'सामाजिक अन्यायाची जाणीव' हा एकच पैलू संशोधनासाठी निवडला गेला. संशोधन उत्तम झाले आहे. संशोधनासाठी आवश्यक असते ती तटस्थता लेखिकेने संशोधन करताना

पाळली आहे. तीच तटस्थता या पुस्तकातील 'सत्र-संचालक : जाणीव विकासाचे माध्यम' या प्रकरणात डोकावते. संशोधनाकडून पुन्हा व्यवहाराकडे वळताना सत्र-संचालक हा जाणीव विकासाचे माध्यम व्हायला हवा एवढे म्हणून पुरेसे नाही. तो आधी जागृत जाणिवेचा स्रोत आणि मग जाणीव विकसनाचे माध्यम असायला लागतो, असा माझा व्यक्तिगत अनुभव मी येथे नोंदवू इच्छितो. माध्यम म्हणून अभिनिवेश टाळायला हवा; परंतु यशस्वी सत्र-संचालक म्हणून विषयानुसार सत्र-संचालकाचा आवेश, चीड, तळमळ, उत्साह, आनंद, अभिमान, संताप, गुंतवणूक, बांधिलकी इ. भाववृत्ती जागृत जाणिवेचा एक नमुना म्हणून विद्यार्थ्यांसमोर यायला हव्या असे माझे मत आहे. आपली भाववृत्ती तर लपवायची नाही आणि ती विद्यार्थ्यांवर लादायचीही नाही, हे कसे करायचे याचेही प्रशिक्षण सत्र-संचालकाच्या प्रशिक्षणामध्ये, व्हायला हवे. मूळ संशोधनाच्या व्याप्तीमध्ये हा भाग नसल्याने तो या पुस्तकातही आलेला नाही.

हे पुस्तक म्हणजे प्रबंधाच्या आधारे तयार केलेली हस्तपुस्तिका (मॅन्युअल) असल्यामुळे या पुस्तकात भाग-१ मध्ये 'गवसलेले सत्य' या चौथ्या प्रकरणात शास्त्रीय निष्कर्षांचा केवळ उल्लेख केलेला आहे. ज्यांना यातील आशयाची शास्त्रीयता तपासायची आहे त्यांना प्रत्यक्ष प्रबंधच बघायला लागेल. ज्यांना यातील आशयाचा परिणाम पडताळून पाहायचा आहे त्यांच्यासाठी भाग-२ मधील पाचही प्रकरणे हा मोठा खजिनाच आहे. या सर्व प्रकरणांमधून विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणिवेचे संवर्धन करण्यासाठी सुरुवात कुठून व कशी करावी याचा कृति-कार्यक्रमच सोदाहरण व सूचनांसह दिलेला आहे. कोणत्याही सूचनेमागचा विचार समजून घ्यायचा असेल तर भाग-१ मधील पहिली तीन प्रकरणे नवीन प्रयोगकर्त्याला उपयोगी पडतील.

ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे हे सातवे प्रकाशन, शिक्षण-प्रक्रिया अधिक समाजाभिमुख व्हायला उपयोगी ठरेल असा विश्वास वाटतो.

सौर चैत्र २३ शके १९२६ — गिरीश श्री. बापट
१२/४/२००४ — संचालक, ज्ञान प्रबोधिनी

# लेखिकेचे मनोगत–ऋणनिर्देश

'सामाजिक जाणीव' या विषयावरील पुस्तिकेबद्दलचे मनोगत लिहिताना मनात अनेक विचार आले आहेत, भावनांची दाटी झाली आहे. वस्तुत: हे पुस्तक ज्ञान प्रबोधिनीच्या किंबहुना भारतीय समाजात अनुकूल, रचनात्मक परिवर्तन व्हावे; म्हणून धडपडणाऱ्या सर्वच संस्था–संघटना–व्यक्तींच्या प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष प्रयत्नांचेच एक प्रतिबिंब आहे, असे म्हणावे लागेल. 'ज्ञान प्रबोधिनी'मध्ये विद्यार्थिनी, कार्यकर्ती, अध्यापिका, संशोधिक आणि प्रबोधिनी कुटुंबातील एक सदस्या म्हणून गेली जवळजवळ वीस–बावीस वर्षे वावरताना प्रबोधिनीचे मला जे दर्शन झाले त्यात निखळ आणि उत्कट अशी सामाजिक हिताची प्रेरणा, राष्ट्रघडणीची प्रेरणा सर्वत्र स्पर्शून जाताना अनुभवास आलेली आहे. ही प्रेरणा बुद्धीला मिळावी आणि सर्व वयाच्या, सर्व स्तरांच्या आणि सर्व प्रकारच्या लोकांनी एकत्र येऊन संघटितपणे समाजपरिवर्तनाचे आपापले दायित्व उचलावे, अशी धडपड ज्ञान प्रबोधिनीच्या उपक्रमांतून, विचारमांडणीतून चालू आहे. विद्यार्थ्यांसाठीसुद्धा जाणीवपूर्वक अशा तासिकांचे, अनुभवसंधींचे आयोजन केले जाते. त्याच प्रक्रियेचा एक भाग असल्याने मी जे जवळून अनुभवले ते प्रबोधिनीव्यतिरिक्तच्या विद्यार्थी मित्रमैत्रिणींनाही मिळू शकेल का? त्यासाठी काही रचना करता येईल का? अशा हेतूने मी 'सामाजिक जाणीव विकसन' या संशोधन विषयाची निवड केली. दुसरी गोष्ट म्हणजे– 'प्रबोधिनीचे सर्वच वेगळे–तुम्हांला भरपूर स्वातंत्र्य असते, पोर्शन संपवण्याची कटकट नसते, अभ्यासक्रम सहकार्य असते, शिवाय 'तुम्ही बुद्धिमान मुले निवडता', आमच्याकडे मुळातच रचना इतकी घट्ट आणि चाकोरीतील आहे, त्यातून सर्व प्रकारची मुले येतात, असे उपक्रम आम्ही कसे चालवू शकणार?' अशा प्रतिक्रिया अनेकदा अन्य शैक्षणिक संस्थांतील अध्यापक–कार्यकर्ते व्यक्त करत असतात. त्या काही प्रमाणात सत्यही आहेत. 'सामाजिक जाणीव' विषयाच्या बाबतीत या समस्येवर आपण काही पर्याय, मार्ग सुचवू शकू का असा विचार मनात आला आणि मुद्दामच या संशोधनासाठी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेव्यतिरिक्तच्या दोन अगदी जुन्या शाळांची निवड केली. त्यातही सर्व प्रकारच्या क्षमतांच्या मुलांचा समावेश होईल असे पाहिले. अर्थातच हे तपशील पुस्तिकेवजा माहितीत अधिक सविस्तर दिलेले आहेत. प्रबोधिनीतील प्रयोग ही बुद्धिमंतांची मक्तेदारी न राहता सर्व उत्सुक विद्यार्थ्यांना ते अनुभवता यावेत या दिशेने टाकलेल्या

अनेक पावलांतील हे एक पाऊल, असेच म्हणावे लागेल. जेव्हा या प्रशिक्षणाचे अनुकूल निष्कर्ष दोन–तीन प्रयोगांनंतर लक्षात आले तेव्हा अशाच प्रकारचे उपक्रम ज्या शिक्षणसंस्थांना, कार्यकर्त्यांना–औपचारिक किंवा अनौपचारिक रचनांमधून करायचे असतील त्यांना या प्रयोगाचा पायाभूत घटक म्हणून उपयोग व्हावा असे वाटले व या पुस्तिकेची कल्पना मनात आली. केवळ अर्थातच अशा प्रकारचे प्रशिक्षण हे 'सामाजिक जाणीव' संपूर्णपणे विकसित व्हायला पुरेसे नाही. ही स्पष्ट जाणीव या पुस्तिकेशी संबंधित सर्वांनाच आहे, कौटुंबिक घटक, आसपासचे वातावरण, विद्यार्थ्यांच्या नित्य संपर्कात असलेल्या लोकांचे दृष्टिकोन व प्रभाव अशा अनेकविध गोष्टींची आंतरक्रिया सामाजिक जाणिवेच्या विकसनाच्या दृष्टीने प्रामुख्याने कारणीभूत होत असते; पण तरीही अशा प्रशिक्षणामुळे बुद्धी, मन आणि कृती या तिन्हीला प्राथमिक चालना नक्कीच मिळू शकेल असा विश्वास या संशोधनाअंती वाटतो आहे.

या संशोधनासाठी सहकार्य केलेल्या सर्व शाळा–त्यांचे व्यवस्थापन, शिक्षक आणि मुख्य म्हणजे सहभागी विद्यार्थि–विद्यार्थिनी, माझ्या विभागातील सदस्य सहकारी यांच्याबद्दल मी मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करते. सुरुवातीपासूनच संशोधन मार्गदर्शक म्हणून माझ्यावर बुद्धि–मनाने मायेची पाखर घालणाऱ्या मा. उषाताई खिरे यांच्या साक्षेपी आणि चिकित्सक दिशादर्शनामुळेच या संशोधनातील वस्तुनिष्ठपणा व व्यक्तिनिरपेक्षता टिकवता आली आहे.

या सर्व खटाटोपाला पुस्तकरूप देण्याची सूचना 'छात्र प्रबोधन'चे संपादक–कार्यकर्ते आणि माझे सहकारी मा. महेंद्र सेठिया यांनी केली व त्याच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतली, याबद्दल मन:पूर्वक आनंद वाटतो.

गेल्या ७–८ वर्षांतील सगळ्या धावपळीत, संशोधनअध्यापन कसरतीत माझ्या कुटुंबीयांनी प्रसाद, ती. भाऊ, सौ. आई आणि मुले या सर्वांनीच मला नेहमीच समजून घेतले, त्यांचाही वाटा या पुस्तकाच्या निर्मितीत आहे.

सर्वांत अखेरीस पण अर्थातच सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'सामाजिक जाणिवेचे प्रत्यंतर ज्यांच्या आयुष्यातून मला आले आणि हे काम करण्यास, निरंतर करत राहण्यास ज्यांच्यामुळे मला सदैव प्रेरणा मिळत आली आहे, त्या माझ्या आई–वडिलांचे, विचार–पाठबळ यामागे नक्कीच आहे. 'ज्ञान प्रबोधिनी'च्या सर्व रचनेचाच मी एक भाग आहे, त्यामुळे त्याबद्दल वेगळी कृतज्ञता व्यक्त करणे योग्य होणार नाही; पण तरीही 'हे स्फुरण येथुनी दिशांतराला जावे'असे घडण्यासाठी या पुस्तकाचा किंचितही हातभार लागला तर ते श्रेय माझ्यापेक्षाही वर उल्लेखलेल्या सर्वांचे आहे यात संशय नाही.

**– अनघा लवळेकर**

# सामाजिक जाणीव संवर्धन : प्रयोगातून – प्रशिक्षणाकडे

## अनुक्रमणिका

पान क्र.

### भाग–१

१.१. सामाजिक जाणीव : संकल्पना, व्याप्ती, स्वरूप........ १
१.२. मंथन ............................................................ ७
१.३. सामाजिक जाणीव : प्रशिक्षणाच्या उंबरठ्यावर........... ११
(रूपरेषा, प्रत्यक्ष कार्यक्रम)
१.४. गवसलेले सत्य ............................................... १८
१.५. सामाजिक जाणीव:
'एकं सत् विप्रा: बहुधा वदन्ति ।'............................ २४
१.६. सत्रसंचालक : जाणीव विकासाचे माध्यम................. ३६
१.७. सहभागी विद्यार्थ्यांची मनोगते ............................... ४१
१.८. सामाजिक जाणीव कशी ओळखावी? कशी मोजावी? ५३

### भाग २

२.१. उपयोजनाच्या दिशा आणि तंत्रे ............................ ५५
२.२. छोट्या कृतिखेळांतून प्रशिक्षण .............................. ५७
२.३. निवडक सत्रांचे ओघतक्ते..................................... ९४
२.४. नमुना सत्रे–दैनंदिनीतून....................................... ११५
२.५. निवडक सचेतकांचे नमुने .................................. १२२

### परिशिष्ट

अ) प्रायोगिक अभ्यासातील विषयांची सूची.................... १२९
आ) गटकार्यांची यादी.............................................. १३०
इ) संदर्भ पुस्तके सूची ....................................... १३१
ई) संदर्भ चित्रपट्टिका सूची .................................. १३२
उ) मुलाखतींत सहभागी झालेल्या मान्यवर व्यक्ती ..... १३३